दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शनिवार दि.१६ मे २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक २५३ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Saturday 16 May 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 253 • Pages 4 • Rate 4 Rs

### दिव्यांग लाभार्थ्यांना मोठा दिलासा!

**मुंबई**–राज्य शासनाने विशेष सहाय्य अनुदान योजनांअंतर्गत लाभ घेणाऱ्या, परंतु वैश्विक ओळखपत्र नसलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना मोठा दिलासा दिला आहे. अशा लाभार्थ्यांना वैश्विक ओळखपत्र काढण्यासाठी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, या कालावधीत त्यांचे अनुदान सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले असल्याची माहिती दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी दिली.मंत्री अतुल सावे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून या निर्णयामुळे यूडीआयडी कार्ड नसलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना दिलासा मिळणार आहे. कोणताही पात्र लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना राबविण्यात येत आहेत.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांशी चर्चेनंतरच परांजपे यांचा शिवसेनेत प्रवेश–उदय सामंत

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

माजी खासदार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आनंद परांजपे यांचा शिवसेनेतील पक्ष प्रवेश हा राष्ट्रवादी काँग्रेस नेतृत्वाशी चर्चा केल्यानंतर झाला आहे, असा दावा शिवसेना नेते व मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी केला. परांजपे यांच्या पक्ष प्रवेशानंतर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वाद निर्माण करणाऱ्या बातम्या निराधार असल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले. बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.मंत्री उदय सामंत म्हणाले की, महायुतीत मित्र पक्षांनी युती धर्माचे पालन करावे, असे सामंजस्याने ठरले आहे. मात्र एखादा पदाधिकारी स्वत:हून पक्ष सोडणार असेल तर त्याने महायुतीतच राहावे ही आमची जबाबदारी आहे. परांजपे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर शिवसेना संसदीय पक्षाचे नेते खासदार श्रीकांत शिंदे यांनी त्यांना स्वगृही परतण्याचे आवाहन केले होते. मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वावर प्रभावित होत परांजपे यांनी तो निर्णय घेतला, असे मंत्री सामंत म्हणाले.

ते पुढे म्हणाले की परांजपे यांचा डीएनए शिवसेनेचाच असल्याने ते स्वगृही परतले. परांजपे यांनी पक्ष प्रवेशावेळी त्यांची भूमिका स्पष्ट केली होती. परांजपे यांच्या शिवसेना प्रवेशानंतर काही लोक संभ्रम निर्माण करत आहेत, जो निराधार आहे, असे ते म्हणाले.

मंत्री उदय सामंत म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आमचा मित्र पक्ष आहे. परांजपे यांच्या पक्ष प्रवेशापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि पक्षाचे सचिव जय पवार यांच्याशी चर्चा केली आणि त्यांना परांजपे यांच्या पक्ष प्रवेशाबाबत कल्पना दिली. परस्पर चर्चेनंतरच परांजपे यांचा शिवसेनेत पक्ष प्रवेश झाला, असे मंत्री सामंत म्हणाले. परांजपे यांनीही कुठेही राष्ट्रवादी नेतृत्वावर नाराजी किंवा टीका केलेली नाही. त्यामुळे परांजपे यांच्या पक्ष प्रवेशामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न निराधार असल्याचे मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले.



### इंधन बचतीसाठी ईव्हीचा वापर वाढवला

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहनानंतर शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व मंत्र्यांना काटकसरीचे आदेश दिले होते. उद्योग विभागानेही ईव्ही वाहनांचा वापर वाढवला असल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले.**

# महिलांच्या सक्षमीकरण व सुरक्षेला देणार प्राधान्य–आ.डॉ.नीलम गोऱ्हे

## डॉ.गोऱ्हे यांची सलग पाचव्यांदा विधानपरिषदेवर बिनविरोध निवड

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

विधानपरिषद सदस्य म्हणून पाचव्यांदा शपथ घेताना जबाबदारी अधिक वाढल्याची भावना व्यक्त करत महिलांच्या सक्षमीकरण व सुरक्षिततेसाठी कठोर कायदे आणि जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी अधिक ताकदीने लढण्याची ग्वाही आमदार व शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी बुधवारी दिली. विधान भवनातील मध्यवर्ती सभागृहात पार पडलेल्या शपथविधी समारंभात त्यांनी सदस्यत्वाची शपथ घेतली.



महाराष्ट्र विधानपरिषदेवर बिनविरोध निवडून आलेल्या नऊ सदस्यांसह पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या एका सदस्याचा शपथविधी यावेळी पार पडला. डॉ. गोऱ्हे यांच्यासह ओमप्रकाश (बच्चू) कडू, अंबादास दानवे, प्रज्ञा सातव, प्रमोद जठार, झीशन सिद्दिकी, माधवी नाईक, सुनील कर्जतकर, विवेक कोल्हे आणि संजय भेंडे यांनी शपथ घेतली.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सहकार्य याबद्दल आभारी आहे, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. २००२ ते २०१४ या काळात विरोधी पक्षात असताना हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली जनतेचे प्रश्न सातत्याने मांडले. २०१४ नंतर सत्तेत काम करताना एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली त्याच विचारांचा वारसा पुढे नेत आहोत, असेही त्या म्हणाल्या.धर्मवीर आनंद दिघे यांच्या कार्यपद्धतीचा उल्लेख करत त्या म्हणाल्या, जिथे कमी, तिथे आम्ही अशी मदतीची भूमिका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व आम्ही शिवसेना महिला आघाडी पुढे नेत आहोत असे डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले. महिलांवरील अत्याचारांच्या घटनांबाबत चिंता व्यक्त करताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, अशा प्रकरणांतील आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील. पीडित मुलींच्या पुनर्वसनासाठीही प्रभावीपणे काम सुरू ठेवणार आहोत.'लाडकी बहीण' योजनेतील सव्वा दोन कोटी महिलांसह राज्यातील महिला लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.लोकशाही मूल्यांना बळकटी देणारा आणि संसदीय परंपरेचा गौरव वाढवणारा हा शपथविधी समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# लोणगाव येथे वादळी वाऱ्यामुळे विहिरीवरील सोलार पम्पाचे नुकसान

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील लोणगाव येथे झालेल्या जोरदार वादळी वाऱ्यामुळे शेतातील विहिरीवर बसविण्यात आलेल्या सोलार पम्पाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे संबंधित शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान झाले असून प्रशासनाकडे नुकसान भरपाईची मागणी करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, श्री. कचरू एकनाथ सोनकांबळे, रा. लोणगाव ता. माजलगाव जि. बीड यांच्या मालकीची मौजे लोणगाव येथील गट क्रमांक ९६ मधील शेती आहे. या शेतातील विहिरीवर उठ्ख कंपनीचा सोलार पम्प बसविण्यात आला होता. दिनांक १३ मे २०२६ रोजी परिसरात आलेल्या वादळी वाऱ्यामुळे सोलार पाट्या व सोलार प्लेटचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. वादळी वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की सोलार यंत्रणेच्या अनेक प्लेट उखडून पडल्या तसेच संपूर्ण यंत्रणा विस्कळीत झाली. त्यामुळे शेतातील पाणीपुरवठा बाधित होण्याची शक्यता निर्माण झाली असून आगामी पिकांवर त्याचा परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.



या घटनेमुळे संबंधित शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून नुकसानग्रस्त शेतकऱ्याने प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून शासनामार्फत आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली आहे. स्थानिक शेतकऱ्यांकडूनही नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची दखल घेऊन प्रशासनाने मदतीचा हात पुढे करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून झाडांची विशेष काळजी

## सार्वजनिक ठिकाणांतील झाडांना टँकरद्वारे पाणी

### खासगी क्षेत्रातील झाडांसाठी गृहनिर्माण संस्थांनी पुढाकार घ्यावा – नागरिकांना आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

आज वाढत्या तापमानाचा मुंबई महानगरातील वृक्षसंपदेवर प्रतिकूल परिणाम होऊ नये तसेच मुंबईकरांना गारवा मिळावा, या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून झाडांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. झाडांच्या मुळांना पुरेसे पाणी न मिळाल्यास ती कमकुवत होऊन झाडे उन्मळून पडण्याची शक्यता निर्माण होते. ही बाब लक्षात घेऊन झाडांसाठी असे पाणी पुरवून संजीवनी देण्यासाठी महानगरपालिकेने हा उपक्रम हाती घेतला आहे. पिण्यासाठी अयोग्य असलेले, परंतु झाडांसाठी पोषक असलेले पाणी यासाठी वापरण्यात येत आहे. सार्वजनिक ठिकाणांतील झाडांना महानगरपालिकेकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तर, खासगी क्षेत्रातील झाडांसाठी संबंधित गृहनिर्माण संस्थांनी पाणीपुरवठा करावा, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने केले आहे. अतिउष्णतेमुळे जमिनीतील ओलावा कमी होतो आणि झाडांवर ताण वाढतो. परिणामी,



झाडांची मुळे कमकुवत होऊन जमिनीवरील पकड सैल पडण्याची शक्यता वाढते. तसेच झाडांच्या फांद्या कोरड्या व ठिसूळ होऊन तुटण्याचा धोका निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेकडून झाडांना नियमित पाणी देण्यावर विशेष भर देण्यात येत आहे.

महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत रस्ते स्वच्छता मोहिमेदरम्यान पाण्याच्या टँकरद्वारे झाडांना पाणी देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. जी दक्षिण विभागात केशवराव खाड्ये मार्ग तसेच सांताक्रुझ व जुहू परिसरात स्वच्छता अभियानासोबत झाडांना पाणी देण्याची विशेष मोहीम राबविण्यात आली आहे. उद्यान विभागाकडूनही मुंबईतील विविध भागांत झाडांची निगा राखणे, आवश्यक ठिकाणी पाणीपुरवठा करणे तसेच झाडांच्या आरोग्याची पाहणी करणे, ही कामे सातत्याने सुरू आहेत. वृक्षतज्ज्ञांच्या मते, झाडांना वेळेवर पाणी मिळाल्यास त्यांच्या अंतर्गत पाणी वहन प्रक्रियेस मदत होते व उष्णतेमुळे निर्माण होणारा ताण कमी होतो. त्यामुळे फांद्या सुकणे, ठिसूळ होणे किंवा झाडांची स्थिरता कमी होणे यांसारख्या समस्या काही प्रमाणात टाळता येतात. उन्हाळ्यात झाडांचे जतन करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. त्यामुळे मुंबईकरांनी आपल्या परिसरातील तसेच गृहनिर्माण संस्थांच्या आवारातील झाडांना वेळोवेळी पाणी घालावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# खाकीला राजकीय रंग भोवला आणि तक्रारींचे सत्र अन् कथित संपत्तीचे ग्रहण

## पोलीस निरीक्षक मारुती मुंडेंची तडकाफडकी उचलबांगडी

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

गणवेशात असताना राजकीय व्यासपीठावरून दिलेल्या 'निवडणूक शुभेच्छा' देगलूरचे पोलीस निरीक्षक मारुती मुंडे यांना चांगल्याच महागात पडल्या आहेत. काँग्रेसच्या प्रदेश पातळीवरील कार्यक्रमातील भाषण आणि एका कार्यकर्त्याच्या वाढदिवसातील वादग्रस्त वक्तव्याचा व्हिडिओ व्हायरल होताच, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी मुंडे यांची तडकाफडकी नांदेड येथे बदली केली आहे. त्यांच्या जागी भाग्यनगर ठाण्याचे अनुभवी पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड यांनी बुधवारी (ता. १३) रात्री उशिरा पदभार स्वीकारला.

देगलूर शहरातील अवैध धंद्यांबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अनेक दिवसांपासून वारंवार तक्रारी पोहोचत होत्या. यामुळे मुंडे यांची बदली होणार हे आधीच निश्चित मानले जात होते. त्यातच राजकीय व्यासपीठावरील त्या 'शुभेच्छां'मुळे निर्माण झालेल्या वादाने यावर अंतिम शिक्कामोर्तब केले.मारुती मुंडे यांची कारकीर्द नेहमीच वादाच्या भोवऱ्यात राहिली. काही सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांनी त्यांच्या कथित संपत्तीची चौकशी करण्याची मागणी करत थेट संबंधित विभागाकडे रीतसर



तक्रारी दाखल केल्या आहेत. याच मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण आंदोलनही छेडण्यात आले होते. या कथित संपत्तीच्या गंभीर प्रकरणामुळे मुंडे यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे.

नवे पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड यांना पोलीस प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांनी मुंबई क्राईम ब्रांच, जुहू पोलीस ठाणे, सोनपेठ, भाग्यनगर आणि नांदेड जिल्हा विशेष शाखेचे प्रमुख म्हणून काम पाहिले आहे. जिल्ह्याच्या भौगोलिक व सामाजिक परिस्थितीची त्यांना अचूक जाण आहे.



नवे पोलीस निरीक्षक बोलमवाड यांच्यासमोरील ५ मोठी आव्हाने

१)शहरातील मटका, जुगार आणि अवैध व्यवसायांचे जाळे नष्ट करणे.

२)कर्नाटक सीमेवरून होणारी गुटखा तस्करी आणि अवैध रेती उपसा रोखणे.

३)रेशनच्या (स्वस्त धान्य) मालाची होणारी काळी विक्री थांबवणे.

४)शहराला विळखा घालणाऱ्या गंभीर वाहतूक समस्येवर तातडीने तोडगा काढणे.

५)खाकीवरील डागाळलेली प्रतिमा सुधारून सर्वसामान्यांमध्ये सुरक्षेची भावना निर्माण करणे.

# संपादकीय

## विकासाचा ‘ग्रीन सिग्नल’ वन्यजीव कॉरिडोर

एकीकडे विकासाची स्वप्ने डोळ्यांत साठवून महामार्गांवरून आपण वाहने चालवतो, मात्र दुसरीकडे डांबरी व आत्ता सिमेंटच्या रस्त्याच्या पलीकडे जंगलातलं अबोल विश्व आपल्या अस्तित्वाची लढाई लढत असते. आपल्यासाठी जो रस्ता प्रवासाचे साधन असतो, तोच रस्ता वाघिणीसाठी, बिबळ्यासाठी किंवा हरिणीसाठी त्यांच्या पिल्लांना सुरक्षित पलीकडे नेण्यासाठी मृत्यूचा सापळा ठरत असतो. आजही त्यांची एकाकी झुंज आपल्याला पहायला मिळते.सन २०१७ ते २०२४ दरम्यान राज्यात १५ हून अधिक वाघ तर प्रतिवर्षी सरासरी ३५ बिबटे रस्ते अपघातांत मृत्यू पावतात. १९९८ ते २०२४ या वर्षांत एकट्या पश्चिम घाटात एकूण ६,५०७ वन्यजीव मृत्युमुखी पडले. यामध्ये १८ टक्के सस्तन प्राणी, ३० टक्के सरीसृप व ५२ टक्के उभयचर यांचा समावेश आहे. ही मुक्या वेदनांची वाट समजून घेताना पक्षी, फुलपाखरे व अनेकांची तर नोंद सुद्धा होत नाही. कारण यासाठी स्वतंत्र अशी यंत्रणा नाही. रस्ते अपघातात रक्ताळलेले निष्पाप जीव म्हणजे केवळ आकडेवारी नसून, ते आपल्या निसर्गसाखळीचे तुटलेले दुवे आहेत. वन्यप्राण्यांचे घर कापून आपण रस्ते बनवले, सबब त्यांना सुरक्षित वाट देणे ही आपली प्राथमिकता असली पाहिजे. मात्र असे व्हायला दशकांची वाट पाहावी लागली. आज एखादा वाघ आपल्या बछड्यांना घेऊन राष्ट्रीय महामार्ग क्र.४४ हायवेखालच्या सुरक्षित अंडरपासमधून शांतपणे मार्गक्रमण करतो, तेव्हा केवळ त्याचे प्राण वाचत नाहीत, तर माणसाने निसर्गाच्या जखमेवर फुंकर मारल्याचा आणि आधुनिकतेने संवेदनशीलतेची हातमिळवणी केल्याचा तो एक हळवा क्षण असतो. हीच ती विकासाची नवी पहाट आहे, जिथे माणसाची गती आणि मुक्या जिवांची सुरक्षितता एकाच वळणावर येऊन आनंदाने भेटते. शाश्वत विकासाचा हाच खरा सुर्वणमध्य आहे, असे मला वाटते.जेव्हा एखादा महामार्ग जंगलातून जातो. तेव्हा तो केवळ जमिनीचेच दोन तुकडे करत नाही, तर वन्यजीवांच्या लाखो वर्षांच्या नैसर्गिक अधिवासाचे आणि त्यांच्या फिरण्याच्या मार्गांचेही विभाजन करतो. या अधिवास विखंडनामुळे (हॅबिटॅट फ्रॅगमेंटेशन) वन्यप्राणी आणि वेगवान वाहने यांच्यात संघर्ष निर्माण होऊन दरवर्षी हजारो वन्यप्राण्यांना आपले प्राण गमवावे लागतात. मात्र, ‘ वन्यजीव कॉरिडोर ’ किंवा प्राण्यांसाठीचे विशेष अंडरपास आणि ओव्हरपासच्या रूपाने गेल्या काही वर्षांत भारतीय रस्ते बांधणीच्या तंत्रज्ञानात एक क्रांतिकारक बदल झाला आहे. हे कॉरिडोर आज खऱ्या अर्थाने विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणारा दुवा ठरत आहेत.वन्यजीव कॉरिडोर किंवा ‘इको-ब्रिज’ची संकल्पना जागतिक स्तरावर सर्वांत आधी १९५० च्या दशकात फ्रान्समध्ये राबवली गेली. नंतर युरोपमधील अनेक देशांनी वन्यजीवांसाठी अशा प्रकारचे ओव्हरपास बांधले. मात्र, या प्रयोगाला खरी प्रसिद्धी आणि मोठे यश मिळाले ते नेदरलँड्स आणि कॅनडामधील ‘बँफ नॅशनल पार्क’मध्ये. कॅनडाने बांधलेल्या या कॉरिडॉर्समुळे तिथे अस्वले आणि हरणांच्या रस्ते अपघातातील मृत्यूंचे प्रमाण ८० टक्क्यांहून कमी झाले.भारतामध्ये या संकल्पनेची मुहूर्तमेढ सन २०१० नंतर रोवली. नागपूर-जबलपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील पेंच व्याघ्र प्रकल्पामध्ये भारतातील अशा प्रकारचा पहिला आणि यशस्वी प्रयोग ठरलाय. हा प्रकल्प एक आदर्श मॉडेल म्हणता येईल. महामार्ग प्राण्यांसाठी सुरक्षित होण्यापूर्वी भारतात दरवर्षी सरासरी ३० ते ४० हजार वन्यप्राणी रस्ते अपघातांत मृत्युमुखी पडत होते. यामध्ये बिबट्यांचे प्रमाण सर्वाधिक होते. एका अंदाजानुसार, दरवर्षी भारतात किमान ४० ते ५० बिबटे आणि कमी अधिक प्रमाणात वाघ रस्ता ओलांडताना आपला जीव गमावतो. याशिवाय सांबर, चितळ, नीलगाय आणि माकडांसारख्या प्राण्यांच्या मृत्यूची संख्या तर हजारांमध्ये आहे मात्र, जिथे जिथे वैज्ञानिक पद्धतीने अंडरपास बांधले गेले आहेत, तिथे हे चित्र बदलले आहे. पेंचमधील एनएच-४४ वरील कॉरिडोरमुळे त्या पट्ट्यातील वन्यप्राण्यांच्या मृत्यूदरात ९५ टक्क्यांहून अधिक घट झाली असून, गेल्या पाच-सहा वर्षांत तिथे हायवेवर एकाही वाघाचा मृत्यू झालेला नाही. या प्रयोगामुळे आजवर किती वन्यप्राणी वाचले, याचा आकडा निश्चितपणे सांगणे कठीण असले तरी कॅमेरा ट्रॅप फुटेजमधील नोंदी थक्क करणाऱ्या आहेत. पेंचमधील केवळ नऊ अंडरपासमधून एका वर्षात ५,८०० हून अधिक वन्यप्राण्यांनी प्रवास केल्याची नोंद आहे. यामध्ये ११ वेगवेगळ्या वाघांचा आणि ६० हून अधिक बिबट्यांचा समावेश आहे. जर हे अंडरपास नसते, तर हे सर्व प्राणी मुख्य महामार्गावर आले असते आणि त्यातील अनेकांचे प्राण जाण्याची दाट शक्यता होती. हा बदल फारच बोलका आहे.समृद्धी महामार्गावरही जवळपास शंभर अशाच शमन उपाय संरचना उभारलेल्या आहेत. याचाच आधार घेऊन बिबटे, नीलगायी, काळवीट आणि इतर प्राणी सुरक्षितपणे मार्गक्रमण करतात. वन्यप्राणी अशा अपघातात मारण्याचे प्रमाण तुलेनेने कमी झाले आहे. या कॉरिडॉर्समुळे देशभरात वर्षाकाठी किमान १० ते १५ हजार मोठ्या वन्यप्राण्यांचे जीव वाचत आहेत. तांत्रिकदृष्ट्या हे कॉरिडोर केवळ पूल नसून ही एक संवेदनशील पर्यावरण पूरक संरचना आहे. प्राण्यांना महामार्गाच्या आवाजाचा आणि हेडलाईटच्या प्रखर प्रकाशाचा त्रास होऊ नये म्हणून लावलेले अनुक्रमे आवाज प्रतिरोध यंत्रणा (साऊंड बॅरियर्स) आणि ‘लाईट कट्स’ (उजेड प्रतिबंधक) हे या प्रकल्पांचे वैशिष्ट्य आहे. रस्त्याच्या कडेला लावलेले लांब कुंपण प्राण्यांना महामार्गावर येण्यापासून रोखते आणि त्यांना सुरक्षित अंडरपासकडे वळवते. यामुळे वाहन चालक सुद्धा बिनधास्तपणे प्रवास करू शकतात. प्रसंगी प्राण्यांचेही जीवही वाचतात. दिल्ली-डेहराडून एक्स्प्रेसवेवर बांधला जाणारा १२ किलोमीटरचा एलिव्हेटेड कॉरिडोर हा या मालिकेतील पुढचा टप्पा असून, तो हत्तींसारख्या महाकाय प्राण्यांच्या स्थलांतरासाठी आशियातील सर्वात मोठे सुरक्षा कवच ठरणार आहे. वन्यजीव कॉरिडोर हे आधुनिक भारताच्या बदलत्या मानसिकतेचे प्रतीक आहेत. रस्ते अपघात आणि मानवी वस्तीत वन्यप्राण्यांचा शिरकाव यांसारख्या समस्यांवर हे शाश्वत उत्तर आहे. ज्या पद्धतीने सह्याद्रीच्या डोंगररांगांपासून ते हिमालयाच्या पायथ्यापर्यंत हे प्रयोग यशस्वी होत आहेत, ते पाहता भविष्यात प्रत्येक नवीन रस्ता हा वन्यजीवांचा शत्रू न ठरता त्यांचा सोबती ठरू शकेल. विकासाची गती कायम ठेवताना निसर्गालाही सोबत घेऊन जाणे, हेच या कॉरिडॉर्सचे खरे यश आहे. आज या मार्गांमुळे वाचलेले वाघ आणि इतर वन्यजीव भारताच्या समृद्ध जैवविविधतेचे रक्षण करत आहेत. वन्यजीव संवर्धनाच्या कामात सक्रिय असताना या शमन उपायांचे महत्त्व प्रकर्षाने जाणवते. हा केवळ विकासाचा मार्ग नाही तर तो आपल्या वन्यप्राण्यांना दिलेला सन्मान आहे.

# खंडेश्वरी मंदिर रस्ता कामात गैरव्यवहाराचा आरोप; चौकशीची ग्रामस्थांची मागणी

**दैनिक वादळ वार्ता**

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील जीवाचीवाडी परिसरातील खंडेश्वरी मंदिराकडे जाणाऱ्या सिमेंट रस्त्याच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या संदर्भात गटविकास अधिकारी, पंचायत समिती केज यांच्याकडे लेखी अर्ज सादर करण्यात आला असून संबंधित कामाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, जीवाचीवाडी येथील ग्रामस्थ बाबासाहेब काशिनाथ चोरे यांनी पंचायत समिती कार्यालयात दिलेल्या अर्जात नमूद केले आहे की, खंडेश्वरी मंदिराकडे जाणाऱ्या सिमेंट रस्त्यासाठी आमदार फंडातून सुमारे आठ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे व अपूर्ण अवस्थेत असल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, संबंधित कामात बोगस बिले उचलण्यात आल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने शासन निधीचा अपव्यय झाल्याचा संशयही ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. रस्त्याचे काम दर्जाहीन झाल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून ग्रामस्थांनी याबाबत निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे.

अर्जात पुढे म्हटले आहे की, गावातील अनेक विकासकामांमध्येही अशाच प्रकारे गैरप्रकार झाल्याची चर्चा असून शासनाच्या पैशांचा योग्य वापर होत नसल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे संबंधित कामाची प्रत्यक्ष पाहणी करून दोषी अधिकारी, संबंधित संस्था व कंत्राटदारांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

ग्रामस्थांनी या प्रकरणाची चौकशी पंचायत समिती स्तरावर न करता स्वतंत्र समितीमार्फत करण्याची मागणी केली असून, चौकशीदरम्यान गावकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची विनंतीही करण्यात आली आहे. तसेच चौकशी अहवाल सार्वजनिक करण्याची मागणीही पुढे आली आहे.

या अर्जाच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी बीड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बीड, जिल्हाधिकारी बीड तसेच आयुक्त कार्यालय संभाजीनगर यांना पाठविण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणाला आता प्रशासकीय पातळीवर गांभीर्याने घेतले जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दरम्यान, संबंधित अधिकाऱ्यांकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. मात्र ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा दिल्याने या प्रकरणाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# गंगाखेड तालुक्यात ‘पेडजाई’ देवीजवळ ७०० वर्षांपूर्वीचे ऐतिहासिक अवशेष आढळले

**दैनिक वादळ वार्ता**

**गंगाखेड । प्रतिनिधी**

दिनांक १४ में. रामप्रसाद ओझा यांज कडुन. गंगाखेड तालुक्यातील टोकवाडी परिसरात, मासोळी धरणाच्या उत्तरेस अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या निसर्गरम्य उंच टेकडीवर विराजमान असलेल्या ‘पेडजाई’ देवीजवळ सुमारे सातशे वर्षांपूर्वीच्या मंदिराचे ऐतिहासिक भग्नावशेष आढळून आले आहेत. कालपर्यंत केवळ सभोवतालच्या काही वाड्या व इसाद गावापुरती मर्यादित असलेली या स्थळाची ओळख आता इतिहास संशोधनामुळे प्रकाशात येत आहे.



परभणी जिल्हा ऐतिहासिक वारसा समितीचे सदस्य तथा शेषाबाई मुंढे महाविद्यालयातील इतिहासतज्ज्ञ प्रा. डॉ. अविनाश खोकले यांनी गंगाखेडचे माजी नगरसेवक तुकारामजी तांदळे यांच्या आग्रहावरून ‘पेडजाई’ देवीच्या टेकडीची पाहणी केली. बारकाईने निरीक्षण केल्यानंतर येथे तेराव्या शतकातील, काळ्या बेसाल्ट पाषाणात बांधलेले, वास्तुशास्त्रीय दृष्ट्या महत्त्वाचे मंदिर अस्तित्वात होते, असा निष्कर्ष त्यांनी मांडला.

मूळ मंदिराची रचना गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडप अशी असून मंदिर पूर्वाभिमुख होते. आजही मुख्य देवतेचे मूळ आसनपीठ, चंद्रशिळा तसेच स्तंभांचे अवशेष सुस्थितीत दिसून येतात. मंदिरापासून पूर्वेस सुमारे पाचशे मीटर अंतरावर काळ्या दगडात बांधलेले छोटे जलकुंड आहे. कोणतेही अतिरिक्त बांधकाम साहित्य न वापरता उभारलेल्या या कुंडाची खोली सुमारे दहा फूट असून, कडक उन्हाळ्यातही त्यात पाणी टिकून आहे. या जलकुंडासह रानुबाई आणि पेडजाई देवीविषयी अनेक लोककथा आजही मौखिक परंपरेत प्रचलित आहेत.

इतिहास अभ्यासकांच्या मते, राणीसावरगाव येथील रेणुका देवी आणि पेडजाई देवीच्या मूळ मंदिराचा कालखंड समान असावा. विशेष म्हणजे, माहूरची रेणुका देवी या प्रसिद्ध शक्तीपीठाशीही या स्थळाचा सांस्कृतिक संदर्भ जोडला जातो. पेडजाईचे मूळ मंदिर सुमारे दोनशे वर्षांपूर्वी पूर्णतः भग्न झाले असून, त्याच जागेवर नंतर दगड, विटा व चुना-मातीच्या साहाय्याने नवीन गर्भगृह आणि लादणीवजा सभामंडप उभारण्यात आला. या बांधकामात इंडो-इस्लामिक शैलीचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. गर्भगृहातील आसनपीठावर असलेले एक मोठे व एक छोटे असे दोन तांदळे महाराष्ट्रातील इतर देवीस्थळांपेक्षा वेगळे वैशिष्ट्य दर्शवतात.

या टेकडीवरून चारही दिशांना जवळपास पंचवीस किलोमीटरपर्यंतचा परिसर सहज दिसतो. मात्र टेकडीच्या पोटाशी सुरू असलेले खोदकाम तातडीने थांबवण्याची गरज असून, अन्यथा नैसर्गिक सौंदर्य व ऐतिहासिक ठेवा धोक्यात येण्याची शक्यता आहे. पुरातत्त्व विभागाने या स्थळाकडे गांभीर्याने लक्ष दिल्यास येथे मंदिराचे शास्त्रशुद्ध पुनर्निर्माण होऊन एक महत्त्वाचे सांस्कृतिक, धार्मिक व ऐतिहासिक पर्यटनस्थळ विकसित होऊ शकते, असे मत डॉ. खोकले यांनी व्यक्त केले.


पाहणीदरम्यान सरपंच प्रकाश नागरगोजे, देवीचे पुजारी गंगाधर सूर्यवंशी (गोंधळी) आणि चंदन लटपटे उपस्थित होते.

# क्रांतीनगरच्या मूलभूत सुविधांसाठी बाबुराव गालफाडे सर आक्रमक, विविध मागण्यांसाठी १५ मे २०२६ पासुन चक्री उपोषणाला सुरुवात

**दैनिक वादळ वार्ता**

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील कानडी रोड परिसरातील क्रांतीनगर,विठ्ठल नगर वार्ड क्रमांक १ येथील नागरिकांनी बाबुराव गालफाडे सरांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मूलभूत नागरीसुविधांच्या मागण्यांसाठी आता आक्रमक भूमिका घेतली असून,दि. १५ मे २०२६ रोजी विठ्ठल मंदिर परिसरात चक्री उपोषण करण्यात आहे आहे. यासंदर्भात बीड जिल्हाधिकारी यांना तसेच बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग सोनवणे यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.नागरिकांच्या म्हणण्यानुसार,१९८३ - ८४ दरम्यान शासनाने निराधार,भूमिहीन,बेघर तसेच अनुसूचित जाती- जमाती,भटक्या-विमुक्त, अल्पसंख्याक घटकातील कुटुंबांना क्रांतीनगर परिसरात प्रत्येकी एक गुंठा जागा व पत्र्याचे घरकुल बांधून मालकी हक्काने वाटप केले होते. मात्र,कालांतरानेअतिवृष्टी,अशिक्षितपणा,अज्ञाना मुळे अनेकांचे कागदपत्रे हरवली.गेल्या चाळीस वर्षांत लोकसंख्या वाढल्याने परिसरातील घरांची संख्या पाचशे ते सहाशेपर्यंत पोहोचली आहे.त्यामुळे



नागरिकांनी शासनाने वाढीव जागा देऊन नियमित मालकी हक्काचे कागद द्यावेत तसेच सर्व नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली आहे.

**नागरिकांच्या प्रमुख मागण्या कोणत्या?**

क्रांतीनगर परिसरातील विठ्ठल मंदिर,महात्माफुले सभागृह,अण्णाभाऊसाठे सभागृह,अंगणवाडी तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या जागांची अधिकृत मोजणी करून नगर पंचायत अभिलेखात नोंद घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय यशकन्स्ट्रक्शन कंपनीने अपूर्ण ठेवलेल्या नाला पुलाच्या रुंदीकरणा चे काम तात्काळ पूर्ण करावे,जुने रस्ते व नाल्यांची दुरुस्ती करावी, बंद पडलेले बोअरवेल व सबमर्सिबल पंप दुरुस्त करून पाणीपुरवठा सुरळीत करावा,अशी मागणी नागरिकांनी केली आहे.रमाई घरकुल योजना व प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांना रखडलेले हप्ते तातडीने वितरित करावेत,सर्वे क्रमांक १०० मधील गायरान जमिनीत शेतरस्ता खुला करावा तसेच संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना आदी योजनांमधील केवायसी अडचणी दूर करून बंद पडलेली मानधने पुन्हा सुरू करावीत,अशीही मागणी करण्यात आली आहे.जुने महात्मा फुले सभागृह जिल्हा नियोजन समिती अथवा आमदार-खासदार निधीतून दुरुस्त करावे,अशी मागणीही निवेदनात नमूद करण्यात आली आहे.

**चार वर्षांत २२ निवेदने; तरीही प्रश्न कायमच**

नागरिकांच्या म्हणण्या नुसार,२०२२ ते २०२६ या कालावधीत विविध प्रश्नांसंदर्भात आंदोलने व तब्बल २२ निवेदने प्रशासनाला देण्यात आली.मात्र अद्याप कोणतीही ठोसकार्यवाही झालेली नसल्याचे यावेळी बोलताना बाबुराव गालफाडे सर म्हणाले.त्यामुळे अखेर नागरिकांनी लोक प्रतिनिधी व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी चक्री उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे.

या आंदोलनात बाबुराव गालफाडे,इरफानपठाण, अनिल लोखंडे,अजय गालफाडे,भिमराव मस्के, अमोल मस्के,इमरान तांबोळी,अमन पठाण, सिताराम वैरागे यांच्या सह परिसरातील नागरिक सहभागी होणार असल्याची माहिती निवेदनातून देण्यात आली आहे.

या निवेदनाच्या प्रती आमदार नमिता मुंदडा, जिल्हाधिकारी बीड, उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई,तहसीलदार केज,नगर पंचायत प्रशासन व पोलीस प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

# जीवन शिक्षण माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय केजचा दहावी व बारावी विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के

**दैनिक वादळ वार्ता**

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिकशिक्षण मंडळाचा इयत्ता दहावी आणि बारावीचा निकाल जाहीर झाला असून या परीक्षेमध्ये जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम राखली आहे.माध्यमिक शालांत परीक्षेत अपर्णा भारत मदने हिने ९३.२० % गुण मिळवून प्रथम, कु.विद्या मेघराज घुले हिने ९२.८०% गुणांसह द्वितीय तर चि.प्रसाद बाळासाहेब थोरात याने ९२.००% गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. कु. राऊत अमृता अभिमान हिने ९१.८०%,कु.श्रुती रवींद्र घुले हिने ९०.६०% गुण मिळवले.३९विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले.प्रथमश्रेणीत ५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत कु.माचवे धनश्री संतोष हिने ७८% गुणां सह प्रथम,चि.दराडे



अशोक बाळू याने ७७.६७% गुणांसह द्वितीय तर कुमारी राऊत लक्ष्मी अंकुश हिने ७४.३३ % गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला.

दोन विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले असून प्रथम श्रेणीत १४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले.संस्थेचे सचिव हारुणभाई इनामदार साहेब,संस्था सदस्य यासीन भाई इनामदार, जीशान इनामदार प्राचार्य श्री.दत्तात्रय हंडीबाग सर, मुख्याध्यापक श्री. रमाकांत ढाकणे सर, बारावी विज्ञान शाखा प्रमुख श्री हावळे सर, वस्तीगृह विभाग प्रमुख श्री.शिंदे सर,बीएससी विभाग प्रमुख श्री.साखरे सर,बंसल क्लासेसचे प्रमुख गोविंद ठोंबरे सर व सर्व कर्मचारीवृंद यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.या विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# केज नगरपंचायत दलित वस्ती सुधार योजनेत कोट्यवधींचा गैरव्यवहार?

## फुलेनगर सभागृह प्रकरणी चौकशीची मागणी ; आंदोलनाचा इशारा

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज नगर पंचायत अंतर्गत दलित वस्ती सुधार योजना सन २०१७-१८ व २०२०-२१ मधील विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.या संदर्भात मा.मुख्याधिकारी,नगर पंचायत केज यांना निवेदन देत संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.निवेदनानुसार, विविध विकास कामां साठी शासनाकडून सुमारे रु.२ कोटी ७७ लाख १८ हजार इतका निधी मंजूर करण्यात आला होता.मात्र संबंधित कामांमध्ये आर्थिक गैर व्यवहार झाल्याची शंका व्यक्त करण्यात आली आहे.विशेषतः वार्ड क्र.७ फुलेनगर,केज येथे सभागृह बांधकामासाठी रु.२४ लाख ९५ हजार निधी मंजूर करण्यात आला होता.संबंधित सभागृहासाठी टेंडर प्रक्रिया देखील पूर्ण झाली होती.परंतु प्रत्यक्षात सभागृहाचे बांधकाम झाले नसतानाही निधी उचलण्यात आल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

याच ठिकाणी आता पुन्हा सुमारे रु.४० लाख खर्चाचे नवीन सभागृह मंजूर करून त्यासाठी वर्कऑर्डर तयार करण्यात येत असल्याची माहिती समोर येत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

तसेच लॉकडाऊनच्या काळात घरकुल घोटाळ्यातील निधी इतर एजन्सीकडे वळविण्यात आल्याप्रमाणेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेतील निधीही गैर मार्गाने वापरण्यात आल्याचा गंभीर आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.सदर प्रकरणातील सर्वकामांची तात्काळ चौकशी करून नवीन सभागृहाच्या कामास स्थगिती द्यावी तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी,अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अशोक गायकवाड यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

तसेच,या प्रकरणाची लवकरात लवकर निष्पक्ष चौकशी करून योग्य कारवाई करण्यात आली नाही,तर फुलेनगर भागातील एल.एफ.सी. चौक येथे लोकशाही मार्गाने आमरण उपोषण आंदोलन छेडण्यात येईल,असा इशाराही देण्यात आला आहे.

या निवेदनासोबत तीन प्रशासकीय मान्यता आदेशांच्या प्रती तसेच सभागृहाचे टेंडर झाल्या बाबतचे पुरावे जोडण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे.




## आ.राजेश पवार साहेब यांच्या वाढदिवसा निमित्त उपजिल्हा रुग्णालयात फळ वाटप



दैनिक वादळ वार्ता

**हनुमंत । चंदनकर नायगाव**

नायगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त उपजिल्हा रुग्णालय नायगाव बाजार येथे रुग्णांना फळ वाटपाचा सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यात आली.या कार्यक्रमास वैद्यकीय अधिकारी डॉ. अपर्णा पपुलवाड मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच आमदार राजेश पवार मित्र मंडळाचे देविदास अण्णा बोबनाळे, राजेश पाटील हंबर्डे, प्रतिभाताई धानोरकर, पल्लवीताई वडजे, माधव पाटील चितले, बळीराम पाटील वडजे, अवकाश पाटील धुपेकर, राजू पाटील बेळगे, माधव पाटील बेंद्रीकर, केशव पाटील हंबर्डे, गोविंद पाटील हंबर्डे, चक्रधर पाटील हंबर्डे, मनीष पाटील हंबर्डे, मारुती पाटील राहेरकार, ऋषिकेश पाटील कदम, रवी राठोड आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.सामाजिक बांधिलकी जपत रुग्णसेवेचा संदेश देणारा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

## भोंदू महाराजांपासून महिलासह समाजाने सावध व्हावे-हनुमंत भोसले

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

सध्या भोंदूगिरीने बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रात थैमान घातले आहे. चमत्कार,संतती प्राप्ती, आजार बरे करणे यासह घरातील समस्या दूर करण्याचा दावा करणारे लोक शंभर टक्के भोंदू असून हे लोक प्रत्यक्ष अप्रत्यक्षपने महिलांचे लैंगिक,आर्थिक शोषण करतात त्यामुळे अशा लोकांकडे महिला मुली व इतर लोकांनी अजिबात जाऊ नये असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे बीड जिल्हाध्यक्ष हनुमंत भोसले यांनी केले आहे.

सध्या भोंदूगिरीचा आवाका प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढला आहे. समाज जागृती व विविध सामाजिक संस्था व लोकांमुळे दररोज किमान एक दोन प्रकरणे बाहेर येत आहेत.असे भोंदू लोक गांव,तालुका किंवा जिल्हा पातळीवर अध्यात्माचा व देव धर्माचा आधार घेवून रनणिती आखून आपला भोंदूगिरीचा धंदा सुरु करतात.सुरुवातीला ते अत्यंत हुशारीने समाजाचा विश्वास प्राप्त करतात व हळू हळू शोषण करायला सुरुवात करतात.प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या भारता सारख्या देशात बेरोजगारी,नोकरी -धंदा वेळेत न मिळणे, आरोग्याच्या वाढत्या समस्या,कांही पती पत्नीच्या शारीरिक दोषामुळे संतती वेळेत न होणे यासह इतर मानसिक आजाराने समाज समस्याग्रस्त झालेला आहे.आपल्या समस्येवर झटक्यात उपाय न झाल्यास समाजातील कर्मकांडे व चमत्कारावर विश्वास असणारा मोठा वर्ग अशा भोंदू लोकांच्या दरबारात हजेरी लावतात.करणी, भानामती,भुतबाधा यासारख्या थोतांड व अस्तित्वात नसणाऱ्या गोष्टीवर विश्वास ठेवून हे लोक अशा भोंदू लोकांचे शिकार बनतात.बीड जिल्हा अंधश्रद्धा निर्मूलन समितीने बीड जिल्ह्यात तांडा,गांव व तालुका पातळीवरील अशा लोकांवर पाळत ठेवली असून बीड पोलिसांच्या मदतीने त्यांच्यावर कायद्या आधारे कठोर कार्यवाही व्हावी व ते पुन्हा सुटू नयेत यासाठी त्यांच्या भोंदूगिरीचे पुरावे व तक्रारदाराच्या तक्रारीसह केस भक्कम करण्या साठी नियोजनबाद्द कार्यवाही केली जाणार आहे.यासाठी समाजाने संपूर्ण सहकार्य करण्याची गरज असल्याचे सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी म्हटले आहे.हे काम केवळ महाराष्ट्र अंनिस चे आहे हा गैरसमज सर्वांनी दूर करावा.हे काम मोठे आहे त्यामुळे फक्त महाराष्ट्र अंनिसवर ही जबाबदारी सोडणे योग्य नाही.खरे पाहता हे काम एकट्या अंनिस चे नसून समाजातील वैद्यकीय क्षेत्र,सामाजिक संस्था व शिक्षण क्षेत्रासह प्रशासन व लोकप्रतिनिधीचे यांचे ही आहे.मात्र यातील अनेक माध्यमे 'हे काम' प्रवाहाच्या विरोधातील असल्याने पुढे येत नसल्याचेही हनुमंत भोसले यांनी म्हटले आहे.जिल्ह्यातील नागरिकांनी आपापल्या परिसरातील अशा भोंदू लोकांची नावे,पूर्ण पत्ता, पुराव्याचे व्हिडिओ व इतर सविस्तर माहिती सह बीड जिल्हाध्यक्ष हनुमंत भोसले (९४२३७३३८८) किंवा जिल्हा कार्याध्यक्ष प्रदीप चव्हाण ( ९४२१४ ४३१७२) अथवा जिथे महाराष्ट्र अंनिस च्या तालुका शाखा आहेत त्या तालुका समितीकडे द्यावेत असेही जिल्हा शाखेने कळवले आहे.



## दत्तकृपा होमिओपॅथी क्लिनिकचे शानदार उदघाटन

# डॉ.शंतनू रत्नपारखे यांच्या माध्यमातून रुग्णांना मिळणार आधुनिक उपचार

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील प्रसिद्ध व्यक्तिमत्व एन. डी. रत्नपारखे यांचे चिरंजीव डॉ. शंतनू रत्नपारखे यांच्या 'दत्तकृपा होमिओपॅथी क्लिनिकचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. या क्लिनिकच्या माध्यमातून आता शहरातील आणि परिसरातील रुग्णांना विविध जुनाट आजारांवर प्रभावी होमिओपॅथिक उपचार एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत.

उद्घाटन प्रसंगी राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून डॉ. शंतनू रत्नपारखे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यामध्ये प्रामुख्याने भाई मुंजा पांचाळ,परमेश्वर आमसुले, किशोर पांचाळ, गणेश देशमुख, यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी डॉ. शंतनू यांच्या वैद्यकीय सेवेचे कौतुक करत, हे क्लिनिक सर्वसामान्य रुग्णांसाठी आधारवड ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.



**या आजारांवर मिळणार विशेष उपचार**

दत्तकृपा होमिओपॅथी क्लिनिकमध्ये आधुनिक पद्धतीने खालील समस्यांवर विशेष उपचार केले जाणार आहेत:

पोटाचे विकार, पित्त, अपचन, गॅसेस आणि दीर्घकालीन पोटाच्या समस्या, त्वचारोग, सोरायसिस, इसब, आणि इतर संसर्गजन्य त्वचारोग शस्त्रक्रिया विरहित उपचार, मुळव्याध, आणि मुतखडा.

जीवनशैलीशी निगडित आजार, थायराईड समस्या, यूरिक सिड वाढणे आणि गाऊट (सांधेदुखी).

होमिओपॅथी ही केवळ आजाराची लक्षणे कमी करत नाही, तर आजार मुळापासून बरा करण्यासाठी प्रभावी ठरते. दत्तकृपा क्लिनिकच्या माध्यमातून आमचा प्रयत्न हाच असेल की, प्रत्येक रुग्णाला वैयक्तिक लक्ष देऊन आणि योग्य निदान करून उपचार द्यावेत, असे प्रतिपादन डॉ. शंतनू रत्नपारखे यांनी यावेळी केले. या क्लिनिकच्या शुभारंभामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून, जास्तीत जास्त रुग्णांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन रत्नपारखे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## माजलगाव तालुका कार्यक्षेत्रात विनापरवाना शेतमाल खरेदी-विक्री करणा-यांवर कारवाई होणार-सभापती जयदत्त नरवडे

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**


शेतक-यांच्या व्यापक हिताचे संरक्षण आणि कृषी उत्पन्न बाजार व्यवस्थेतील पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी माजलगाव तालुका कार्यक्षेत्रात विनापरवाना शेतमाल खरेदी - विक्री करणा-यांवर कारवाई होणार असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांनी दिली आहे.





महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ अंतर्गत राज्यातील शेतमाल खरेदी - विक्री व्यवहाराचे नियमन करण्यात येते. परंतु तालुक्यातील काही ग्रामीण भागात अनेक व्यापारी, संस्था तसेच काही शेतकरी उत्पादक कंपन्या कोणत्याही परवान्याविना शेतमाल खरेदी - विक्री करत असल्याचा प्रकार घडत आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करण्यात येणार आहे. माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने यासंदर्भात परिपत्रक जाहिर केले असून संबंधितांना वेळोवेळी सुचना देवुनही काही व्यापारी व संस्था विनापरवाना व्यवहार करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता कायद्यानुसार आवश्यक परवाना घेतल्याशिवाय शेतमाल खरेदी - विक्रीचा व्यवसाय करता येणार नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे. मा.पणन संचालक यांचे दि. ०८ मे २०२६ व मा. जिल्हा उपनिबंधक कार्यालय बीड यांचे पत्र दि. ११ मे २०२६रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात शेतमाल व्यापारासाठी परवाना घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे माजलगाव तालुका कार्यक्षेत्रात विना परवाना शेतीमाल खरेदी - विक्री करणा-या व्यापा-यांवर कारवाई करण्याचा ईशारा बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांनी दिला आहे.

## केज येथे पोलीसांची धाडसी कारवाई,तीस पशूंना मिळाले जीवदान



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केजपोलीस प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने एका मोठ्या कारवाईत ३० पशूंची सुटका करण्यात यश आले आहे.केज येथील कुरेशी मोहल्ला, केज येथे मिळालेल्या गुप्त माहिती वरून धडक कारवाई करून तीस देशी गोमाता व नंदी यांची कसायांच्या तावडीतून सुटका करण्यात केज पोलिसांना यश मिळाले आहे व मुक्या प्राण्यांचा जीव वाचला आहे.या गोवंशाची सुटका करण्यात आलेल्या सर्व पशूंना पुढील संरक्षण आणि संगोपनासाठी 'जय हिंद गोरक्षण गोशाळा,कानडी माळी' येथे वर्ग करण्यात आले आहे.ही यशस्वी मोहीम बीड जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.नवनीत कावत साहेब,सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. व्यंकटराम साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि केज पोलीस ठाण्याचे पीआय स्वप्निल उणवणे साहेब तसेच ए.पी.आय. संदीप मांजरमे साहेब व त्यांच्या सर्व कर्तव्यदक्ष पोलीस बांधवांच्या सतर्कतेमुळे यशस्वी झाली.बीड जिल्ह्यातील समर्पित गोरक्षक टीम प्राण्यांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या संरक्षणा साठी आम्ही सदैव तत्पर आहोत असे गोरक्षक टीमच्या वतीने सांगण्यात आले आहे.तसेच सर्व पोलीस बांधवांचे आभार मानले आहेत.

# हणेगाव परिसरात खत माफियांची मुजोरी वाढली डीएपी खताची अवैध दरवाढ

## दोषी कृषी सेवा केंद्रांवर कठोर कारवाईची शेतकऱ्यांची मागणी

दैनिक वादळ वार्ता

**देगलूर । प्रतिनिधी**

खरीप हंगाम तोंडावर आला असताना हणेगाव परिसरातील अनेक कृषी सेवा केंद्रांमध्ये डीएपी खताची जादा दराने विक्री होत असल्याच्या तक्रारींनी शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा प्रति बॅग २०० ते ३०० रुपयांपर्यंत अधिक पैसे घेतले जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, डीएपी खताची अधिकृत किंमत निश्चित असतानाही काही कृषी सेवा केंद्र चालकांकडून कृत्रिम टंचाई निर्माण करून खताचा काळाबाजार केला जात आहे. अनेक ठिकाणी खत उपलब्ध नाही असे सांगितले जाते, मात्र जादा पैसे देणाऱ्यांना लगेच खत पुरवले जात असल्याचेही बोलले जात आहे. यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी त्रस्त झाले असून प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.




हणेगाव परिसरातील काही शेतकऱ्यांनी सांगितले की, खत खरेदी करताना पक्के बिल दिले जात नाही. तसेच बिलावर नमूद असलेल्या किंमतीपेक्षा प्रत्यक्षात अधिक रक्कम घेतली जाते. त्यामुळे कृषी विभागाने तातडीने गुप्त पथके नियुक्त करून कृषी सेवा केंद्रांची तपासणी करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

प्रशासनाने तत्काळ लक्ष देण्याची गरज शेतकऱ्यांनी जिल्हा कृषी अधीक्षक व तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे कारवाईची मागणी केली असून, जादा दराने खत विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करावेत, अशी मागणी करण्यात येत आहे. केवळ नोटीस देऊन कारवाईचा दिखावा न करता थेट परवाना रद्द करण्याची ठोस भूमिका प्रशासनाने घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**पेरणीपूर्वीच शेतकरी आर्थिक संकटात**

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आधीच बियाणे, औषधे आणि खतांच्या वाढत्या किमतींमुळे आर्थिक तणावात आहेत. अशा परिस्थितीत खतांच्या जादा दरामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडत असल्याची भावना व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांच्या घामाचा पैसा लुटणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी संतप्त प्रतिक्रिया परिसरातील नागरिकांनी दिली आहे.

# दैनिक वादळ वार्ताचा इम्पॅक्ट!

## दलित शेतकऱ्याच्या खात्यावर ७४ हजार ९०० रुपये जमा

### बातमी प्रसिद्ध होताच आवादा कंपनीची धावपळ ; शेतकऱ्यांच्या आंदोलनाला तात्पुरता ब्रेक?

**वादळ वार्ताच्या बातमीची प्रशासनात चर्चा**

दलित शेतकऱ्याच्या प्रकरणाची दैनिक वादळ वार्तांने घेतलेली आक्रमक भूमिका सध्या तालुक्यात चर्चेचा विषय ठरत आहे. बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर अवघ्या काही तासांत संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा झाल्याने वादळ वार्ताच्या बातमीचा प्रभाव पुन्हा एकदा दिसून आल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील कानडी माळी येथील दलित शेतकरी महादेव भिकाजी मस्के यांनी आवादा कंपनीविरोधात केलेल्या गंभीर आरोपांची बातमी दैनिक वादळ वार्ता मध्ये प्रसिद्ध होताच मोठा परिणाम दिसून आला आहे. मोबदला रखडवून फसवणूक केल्याचा आरोप झाल्यानंतर अखेर संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर ७४ हजार ९०० रुपये जमा करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

पवनचक्की प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनीतील वृक्षतोड तसेच हाय व्होल्टेज वीजवाहिनी टाकण्यात आल्यानंतर कंपनीकडून मोठा मोबदला देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात रक्कम न मिळाल्याने शेतकरी संतप्त झाले होते. यामध्ये ७५ हजार रुपयांचा धनादेश बाऊन्स झाल्याचा गंभीर प्रकारही समोर आला होता.

या प्रकरणी आवादा कंपनीने दलित शेतकऱ्याला गंडवले ? या मथळ्याखाली दैनिक वादळ वार्तांने सविस्तर वृत्त प्रसिद्ध केले होते. या बातमीनंतर प्रशासनासह संबंधित कंपनीमध्ये मोठी खळबळ उडाली. त्यानंतर तातडीने हालचाली सुरू झाल्या आणि अखेर संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर ७४ हजार ९०० रुपये जमा करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

दरम्यान, उर्वरित मोबदल्याबाबत अद्यापही प्रश्न कायम असून शेतकऱ्यांनी पूर्ण रक्कम मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका घेतली आहे. दैनिक वादळ वार्तांने सातत्याने या प्रश्नाला वाचा फोडल्यामुळेच कंपनीला पैसे जमा करण्यास भाग पाडले गेले, अशी भावना परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

या घटनेमुळे ग्रामीण भागातील सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यात माध्यमांची भूमिका किती महत्त्वाची आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.


दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • मंगळवार दि.१२ मे २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक २५० • पाने ४ • किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi • Tuesday 12 May 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 250 • Pages 4 • Rate 4 Rs

**मोदींच्या काळात कामगारांची अवस्था बिकट**

**आवादा कंपनीने दलित शेतकऱ्याला गंडवले?**

**७५ हजाराचा चेक दिला मात्र चेक वटलाच नाही**

**मोबदला न दिल्याने २५ मे रोजी आमरण उपोषणाचा इशारा**

**शेतकऱ्यांची सेटलमेंट करण्यासाठी दलालांचा वापर ?**

**तहसीलदार भंडारे साहेब लक्ष देणार का ?**

दलित शेतकऱ्याच्या मोबदल्याचा प्रश्न अद्याप प्रलंबित असून धनादेश बाऊन्स झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित कंपनीकडून प्रतिसाद मिळत नसल्याने आता प्रशासन काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पीडित शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी तहसीलदार भंडारे साहेब पुढाकार घेणार का ? असा सवाल परिसरातील शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

**संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी**

12 May 2026 - Page 1 | epaper.vadalvarta.com
Powered by softisky | 9764331134

**मोबदल्यापासून वंचित शेतकऱ्यांनी संपर्क साधावा**

पवनचक्की प्रकल्प, वीजवाहिनी, वृक्षतोड किंवा जमीन वापर प्रकरणात ज्या शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत मोबदला मिळालेला नाही अथवा अत्यल्प मोबदला देऊन फसवणूक करण्यात आली आहे, अशा शेतकऱ्यांनी दैनिक वादळ वार्ताचे संपादक अजय भांगे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित शेतकऱ्यांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवून न्याय मिळवून देण्यासाठी दैनिक वादळ वार्ता पुढाकार घेणार असल्याचे सांगण्यात आले.

## शिवकालीन युद्धकला व शिवसंस्कार उन्हाळी शिबीर सांगता समारंभ संपन्न

दैनिक वादळ वार्ता
चऱ्होली । प्रतिनिधी




नवजीवन स्पोर्ट्स फाउंडेशन, दिघी पुणे-१५ आयोजित शिवकालीन युद्धकला व शिवसंस्कार उन्हाळी शिबीराचा सांगता समारंभ दि. १३ मे २०२६ रोजी सनशाईन डड इंटरनॅशनल स्कूल,चऱ्होली येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

दि. ४ मे २०२६ ते दि. १३ मे २०२६ या कालावधीत चाललेल्या या १० दिवसीय शिबीरात खेळाडूंना शिवकालीन युद्धकला, मर्दानी खेळ आणि शिवसंस्कारांचे प्रशिक्षण देण्यात आले. या शिबीर मध्ये तीन दल बनवले तोरणादल, प्रतापगडदल, शिवनेरीदल असे गट तयार करून प्रत्येक दल चे सांगता शेवटी प्रात्यक्षिक करून घेतले.या शिबीर मध्ये महाराष्ट्र मधील प्रसिद्ध असे सह्याद्रीचे भुते ट्रेकर्स चे अध्यक्ष आणि दुर्गशतकवीर श्री राज दादा तपसे यांनी शिबीर मध्ये भाग घेऊन प्रशिक्षण घेतले.

सांगता समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून शिबीर मधील सर्व खेळाडूंचे पालक उपस्थित होते. पालकांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष स्नेह आणि प्रोत्साहन लाभले. यावेळी शिबीराचे मार्गदर्शक श्री. उदयभाऊ गायकवाड , सनशाईन स्कूल, प्रशिक्षक सौ. दिपाली जयेश पाटील, आणि नवजीवन स्पोर्ट्स फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

शिबीरात प्रशिक्षण घेतलेल्या खेळाडूंनी शिवकालीन युद्धकलेचे प्रात्यक्षिक सादर केले. खेळाडूंनी दाखवलेली शिस्त, ताकद आणि कौशल्य पाहून उपस्थित पालक व रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शिवकालीन युद्धकला आणि संस्कार हे आपल्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहेत. अशा शिबीरांमधून मुलांमध्ये शिस्त, आत्मविश्वास आणि देशाभिमान निर्माण होतो. पुढेही हा क्लास सुरु राहणार आहे असे कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी सर्व खेळाडूंना प्रमाणपत्रे देऊन गौरवण्यात आले. नवजीवन स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने प्रशिक्षक, पालक, सनशाईन स्कूल प्रशासन आणि उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

## पत्रकार संघाचे संस्थापक संजय भोकरे यांना झेड प्लस सुरक्षा देवून हत्येच्या कटा मागील मुख्य सूत्रधार शोधा-वैभव स्वामी

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी



सांगलीत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक तथा राज्य संघटक संजय भोकरे यांच्या हत्येचा डाव पोलिसांनी उधळून लावला आहे.या प्रकरणामुळे भोकरे कुटुंबियांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. राज्य सरकारने याची गांभीर्याने दखल घेवून या घटने मागील मुख्य सूत्रधारांना अटक करून भोकरे साहेब यांना झेड प्लस सुरक्षा द्यावी अशी मागणी पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या नेतृत्वा खालील बीड जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आली. सांगली पोलिसांनी या प्रकरणात तीन आरोपींना पाच दिवसापूर्वी अटक केली.त्यांच्या ताब्यातून दोन देशी बनावटीची पिस्तुले,चार जिवंत काडतुसे आणि धारदार शस्त्रे जप्त करण्यात आली.मात्र अजूनही मुख्य सूत्रधारांना पकडण्यात पोलिसांना यश आले नाही.त्यामुळे त्यांना झेड प्लस सुरक्षा द्यावी आणि मुख्य सूत्रधारांना तात्काळ अटक करून त्यांचे चेहरे समोर आणावेत. पोलिसांनी या प्रकरणात कोणालाही पाठीशी घालू नये अशी लेखी मागणी निवेदनाद्वारे बीड जिल्हा शाखेच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत करण्यात आली.या मागणीचे निवेदन निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना देताना पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्यासह महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष शेख ताहेर, जिल्हा सहसचिव अमोल शिंदे,सदस्य शेख एजाज वडवणी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत प्रवेशोत्सव मेळावा संपन्न



दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्रकेज मुलांची ता.केज शाळेत इयत्ता पहिली वर्गात नवीन प्रवेश घेतलेल्या लाभार्थ्यांचे प्रथम पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रवेशोत्सवा निमित्त स्वागताच्या स्वागतासाठी विविध स्टॉल लावण्यात आले होते.याकार्यक्रमास ग्रामपंचायत कुंबेफळचे विद्यमान सरपंच श्री. अविनाश पांचाळ,सौ. श्रध्दा विष्णु थोरात उपसरपंच,शिक्षणप्रेमी श्री.विष्णु थोरात आबा, शाळा व्यवस्थापन समिती विद्यमान अध्यक्ष सौ.शालु विजय थोरात, उपाध्यक्ष सौ.अश्विनी श्रीकांत थोरात,श्री. प्रकाश थोरात उर्फ बंडु आबा,सुरेश नाना थोरात, किशोर तात्या थोरात या शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी नवागतांचे स्वागत केले.या कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य,माजी विद्यार्थी समिती अध्यक्ष श्री मधुकर थोरात, अंगणवाडी ताई श्रीमती उषाताई नागनाथ शेंडगे, श्रीमती अश्विनी रत्नाकर इंगोले,श्रीमती रमण भागवत यादव, अंगणवाडी मदतनीस, मातापालक,शिक्षणप्रेमी नागरिक, महिला, एसबीआय बँक अंबाजोगाईचे डेप्युटी मॅनेजर श्री.धनराज गौतमराव थोरात, कुंबेफळचे नवनिर्वाचित पोलीस पाटील सौ.नेहा धनराज थोरात,जीडीएस एबीपीएम सौ.प्रियंका ऋषिकेश थोरात,पीएम पोषण शक्ती निर्माण योजना कामगार सौ. स्वर्णमाला पवार,सौ. अनिता पवार या शाळेचे प्राथमिक पदवीधर डॉ. श्री.रामकिशन ग्यानबा मुळे सर,गणित विज्ञान चे प्राथमिक पदवीधर शिक्षक श्री.संदीप मेघराज ठोंबरे सर, सहशिक्षक श्री.आकाश दत्तु लोंढे सर,श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम,श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम,श्री.राहुल बजरंग बचुटे,श्री. आबासाहेब तुळशिराम धपाटे शाळेतील सर्व विद्यार्थी,विद्यार्थिनी उपस्थित होते.यावेळी कुंबेफळचे नवनियुक्त पोलिस पाटील सौ.नेहा धनराज थोरात, एसबीआय बँक अंबाजोगाई चे सीबीओ यांची डेप्युटी मॅनेजर पदी पदोन्नती झालेले श्री. धनराज गौतमराव थोरात जीडीएस एबीपीएम पदी नवनियुक्त झालेल्या सौ. प्रियंका ऋषिकेश थोरात यांचा शाल श्रीफळ, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला व श्री.आकाश दत्तात्रय लोंढे सर यांनी आभार मानून अध्यक्षीय परवानगीने कार्यक्रम संपल्याचे सांगितले.

## केज तालुक्यातील देवगाव परिसरात वादळी वाऱ्यासह पाऊस,आंब्याचे अतोनात नुकसान

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी



केज तालुक्याला वादळी वाऱ्यासह पावसाने झोडपले परिसरातील आंबा पिकाचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे फारचं नुकसान झाले या बाबत सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील देवगाव परिसरात वादळी वाऱ्या सह पाऊस झाला. त्यामुळे जोमदार आलेल्या आंब्याचे वादळी वाऱ्याने आंबे पडल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले हातातोंडाशी आलेला घास वादळी वाऱ्यामुळे मातीमोल झाल्याने शेतकरी आणखी संकटात सापडला आहे.

## स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज शौर्य, पराक्रम सामर्थ्य व बुद्धीचे प्रतिक-डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी




स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज शौर्य, पराक्रम,सामर्थ्य व बुद्धीचे प्रतिक होते असे प्रतिपादन जेष्ठ विचार वंत,जेष्ठ समाज सेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिध्द वक्ते व परखड व्याख्याते डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे आयोजित १४ मे रोजी स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त आयोजित व्याख्यान कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माणीक बप्पा गायकवाड हे होते. प्रमुख बुधभुषणम ग्रंथ वाचक संजय सोनवणे, एस.के.वैरागे यांनी बुधभुषणम,नखशिखांत या छत्रपती संभाजीराजे लिखित ग्रंथांचे वाचन केले.प्रमुख पाहुणे म्हणून नारायणभाऊ गायकवाड रावसाहेब जाधव, बाळासाहेब गायकवाड यांची उपस्थिती होती.

मोठया संख्येने वाचक, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.दि. १२मे २०२६ रोजी संत मुक्ताबाई पुण्यातिथी व परिचारिका दिन साजरा करण्यात आला.सर्व कार्यक्रमाचे प्रास्ताविक,सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077